मुंबई विद्यापीठ

मा.गांधी रोड

जा.क्र.बीसीसी/२९/३३४ /१९९७.
दिनांक :- २५ सप्टेंबर, १९९७.

परिपत्रक :-

प्रति,
अध्यक्ष/सचिव,
सर्व शैक्षणिक संस्था व मंडळे.

प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित अशासकीय महाविद्यालये व
मान्यताप्राप्त पदव्युत्तर शिक्षण संस्था.

विषय :- संवैधानिक आरक्षण ५० टक्क्यापेक्षा जास्त होऊ न देण्याबाबत.

संदर्भ :- शासन निर्णय क्र. टीईएम ३३९७/१२९२५/[९०८६]/तांशि-१ दिनांक ११ जुलै, १९९७.

वाचा :-
१. विद्यापीठ परिपत्रक क्र.बीसीसी/२९/३००/९५ दिनांक १८ जुलै, १९९५.
२. विद्यापीठ परिपत्रक क्र.बीसीसी/२९/३०१/९५ दिनांक १८ जुलै, १९९५
३. विद्यापीठ परिपत्रक क्र.बीसीसी/२९/३४७/९४ दिनांक २५ जुलै, १९९४.
४. विद्यापीठ परिपत्रक क्र.बीसीसी/२९/३६०/९५ दिनांक ११ सप्टेंबर, १९९५.

महोदय/महोदया,

१९९७-९८ या शैक्षणिक वर्षापासून उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली येत असलेल्या सर्व शैक्षणिक संस्थानातील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी संवैधानिक आरक्षण ५० टक्क्यापेक्षा जास्त होऊ न देण्याबाबतचा दिनांक ११ जुलै,१९९७ चा शासन निर्णय क्रमांक टीईएम ३३९७/१२९२५/[९०८६] तांशि-१,शासनाचे सहसचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांनी निर्गमित केला आहे. [सदर शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे]. शासनाचा सदर निर्णय दिनांक ३० ऑगस्ट,१९९७ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेपुढे बाब क्र.१५ नुसार ठेऊन असे ठरविण्यात आले आहे की, १९९७-९८ या शैक्षणिक वर्षापासून उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली येत असलेल्या सर्व शैक्षणिक संस्थातील अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी संवैधानिक आरक्षण ५०

...२/

टक्क्यापेक्षा जास्त होऊ न देण्याबाबतचा शासन निर्णय स्वीकारण्यात यावा.

वरील ठरावानुसार असे कळविण्यात येते की, सर्व शैक्षणिक संस्थातील अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी १९९७-९८ या वर्षापासून संवैधानिक आरक्षण ५० टक्क्यापेक्षा जास्त होऊ न देण्याबाबत विद्यापीठ परिपत्रकाची अंमलबजावणी करताना शासन निर्णय दिनांक ११ जुलै, १९९७ मधील आदेश लक्षात घेऊन कार्यवाही करावी.

आपला,

(सही)

प्रा. म. ली. कांबळी
प्रभारी कुलसचिव.

प्रत, योग्य त्या कार्यवाहीसाठी अभिवादनपूर्वक अग्रेषित.

अ. १. संचालक, रसायन तंत्र विभाग, मुंबई विद्यापीठ [स्वायत्त].
२. संचालक, जमनालाल बजाज व्यवस्थापन शिक्षण संस्था, मुंबई २०.

ब. प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
१. संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
२. संचालक/प्रमुख विद्यापीठ विभाग, प्राचार्य, सर का.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय.
३. संचालक, परिचित उद्योग उपकरण केंद्र.
४. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा.
५. संचालक, नरवाडे व्यवसाय शिक्षण व विकास संस्था.
६. ग्रंथपाल, मुंबई विद्यापीठ ग्रंथालय.
७. परीक्षाधीन अधिकारी, मुंबई विद्यापीठ व एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, व महाविद्यालय लवाद न्यायाधिकरण.
८. व्यवस्थापन परिषदेचे सर्व सदस्य.
९. मानद विधी सल्लागार, मुंबई विद्यापीठ.

क. १. सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई.

ड. १. विद्यापीठातील सर्व उपकुलसचिव व सर्व सहायक कुलसचिव,
२. सहायक कुलसचिव, विद्यापीठ प्रशासकीय उपकेंद्र, रत्नागिरी.
३. कुलसचिवांच्या कार्यालयातील विविध विभागाचे प्रमुख.
४. उप प्रादेशिक सेवायोजन अधिकारी, विद्यापीठ सेवायोजन आणि मार्गदर्शन केंद्र.
५. सुरक्षा अधिकारी व सर्व सहायक सुरक्षा अधिकारी.
६. स्वीय सहायक १. कुलगुरु २. प्र-कुलगुरु ३. कुलसचिव.
७. अभिलेखा [रेकॉर्ड] विभाग १० प्रती.

इ. १. सचिव, अशासकीय महाविद्यालयांच्या प्राचार्यांची समिती, द्वारा श्री. चिनाई वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, डॉ. एस. राधाकृष्णन मार्ग, अंधेरी [पूर्व], मुंबई ४०० ०६९.
२. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षक संघ, विद्यापीठ विद्यार्थी भवन, चर्नी रोड, चर्चगेट, मुंबई ४०० ०२० [दोन प्रती].
३. महाराष्ट्र लेडर प्रिव्हिलेज्ड टिचर्स असोसिएशन, ५/७७, आझाद नगर, अंधेरी [प.], मुंबई ४०० ०५८.

[प्रा. च. सी. कांचळी.]
प्रभारी कुलसचिव.

मुंबई,

दि. २५ सप्टेंबर १९९७

वैधानिक आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा
जास्त होऊ न देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र. टीईएम ३३९७/१२९२६/[९०८६]/तांशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ११ जुलै, १९९७.

संदर्भ:- १] शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. युएसजी १४९३/२४२८/विशि-४, दि. २३ जून, १९९४ व समक्रमांकित शुध्दिपत्र दि. जुलै, १९९४.

२] शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्र. सी १४९४/प्र.क्र. २३६/मावक-५, दि. १३ जून, १९९५ व समक्रमांकित शुध्दिपत्र दि. १५ जून, १९९५.

३] शासन निर्णय क्र. सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी १०९४/प्र.क्र. ६९४/१६-ब, दि. १५जून, १९९५ व शुध्दिपत्रक दि. २१ मार्च, १९९६.

४] शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. युएसजी १४९३/२४२८/विशि-४, दि. २२ जून, १९९५.

५] अतिरिक्त सरकारी वकील, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र. एडीजीपी/डब्ल्युपी/एसएलजी, दि. १०.७.१९९७.

## प्रस्तावना :-

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी १०९३/१६७/सीआर-१४१/९१ ९३/१६-ब, दि. २३ मार्च, १९९४ अन्वये विविध मागास प्रवर्गासाठी एकूण ५० टक्के आरक्षण
प्र. शैक्षणिक विहित करण्यात आले होते. नंतर सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या काही जातींच्या विकासासाठी काही सवलती व उपाययोजना करणे आवश्यक असल्यामुळे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी १०९१/प्र.क्र. ६८/९४/१६-ब, दि. ८ डिसेंबर, १९९४ परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेल्या जातींसाठी एक स्वतंत्र 'विशेष मागास प्रवर्ग' असे संबोधण्यात येऊन त्यांच्यासाठी २ [दोन] टक्के आरक्षण ठेवण्यात आले होते. तसेच या प्रवर्गासाठी क्रिमिलेयरचे तत्व लागू नाही हेही स्पष्ट करण्यात आले होते.

दि. ८ डिसेंबर, १९९४ च्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन आदेशास अनुसरुन उच्च व तंत्रशिक्षण विभागाने 'विशेष मागास प्रवर्गासाठी' २ टक्के आरक्षण ठेवून शासन निर्णय क्र. युएसजी १४९३/[२४२८]/विशि-४, दि. २२ जून, १९९५ अन्वये विविध आरक्षणाबाबत आदेश निर्गमित केले आहेत. सदर निर्णयाद्वारे विशेष मागास प्रवर्गासाठी २ टक्के आरक्षण तरतूद करण्यात आली असून एकूण आरक्षण ५२ टक्के विहित केले आहे.

भारतीय संविधान अनुच्छेद १४ तसेच १६ अन्वये सर्व प्रवर्गातील घटकांना समानता व समान संधी मिळावी म्हणून मा. सर्वोच्च न्यायालयाने १९९२ साली मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा-जास्त नसू नये असा निवाडा दिला आहे.

रिट याचिका क्र. २९८९/१९९७, श्री. पांडुरंग एस. पवार विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर, या प्रकरणी सुनावणी सुरु असताना मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या १९९७-९८ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश नियमावलीत संवैधानिक आरक्षणासाठी केलेली ५२ टक्के जागांची तरतूद मा. सर्वोच्च न्यायालयाने इंद्रा सॉहनी विरुध्द केंद्र या प्रकरणी १९९२ साली दिलेल्या निवाड्यानुसार नसल्यामुळे कायदेशीर नसल्याचे शासनाचे निदर्शनास आणून दिले आहे. [संदर्भ: १९९३ मा. सर्वोच्च न्यायालय ए. आर. -प. क्र. ४७७, शीर्ष टिप्पणी [डब्ल्यू] प्रवेश नियमावलीतील राज्य शासनाने संवैधानिक आरक्षणासाठी केलेली ५२ टक्के जागांची तरतूद ही मा. सर्वोच्च न्यायालयाची अवमान ठरु शकते असेही मा. उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. यावर संवैधानिक आरक्षणाचे प्रमाण ५२ टक्क्यांवरुन ५० टक्के करण्यांबाबतचे आदेश तात्काळ निर्गमित करण्यात येतील असे शासनातर्फे प्रतिपादन केल्यानंतर मा. उच्च न्यायालयाने समाधान व्यक्त केले असून उपरोक्त संदर्भात शासन आता खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>शासन निर्णय</u> :-

शासन आता या शासन निर्णयाद्वारे असे आदेश देत आहे की, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली येत असलेल्या सर्व शैक्षणिक संस्थांतील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी या विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. पुएसजी १४९३/[२५२८]/वि ४, दि. २२ जून, १९९५ अन्वये विशेष मागास प्रवर्गाकरिता राखून ठेवण्यात आलेल्या २ ट जागांचे आरक्षणाबाबत पुढील आदेशापर्यंत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. हे आदेश १९९७-९८ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात येत असून तात्काळ अंमलात येतील। उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत शैक्षणिक संस्थांतील सर्व विद्या शाखांतील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी लागू राहतील.

१. विशेष मागास प्रवर्गात ज्या जाती आहेत त्यापैकी काही जाती इतर मागासवर्गीयांमध्ये समाविष्ट होत्या. त्यामुळे सुरुवातीस विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र धारक उमेदवारांची जात ज्या मागास प्रवर्गामध्ये समाविष्ट होती. त्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणासाठी पात्र समजण्यात यावी.

२. भारतीय संविधानानुसार मंडल आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. टीईएम १०९४/[६३०३] तांशि-१, दि. ३ जून, १९९४ मधील परिच्छेद क्र. ४ मध्ये विहित केल्याप्रमाणे एकूण ५० टक्के जागा आरक्षित करण्यात याव्यात. सदर आरक्षण प्रत्येक संस्थेमध्ये अभ्यासक्रम निहाय राहील. मुक्त [मेरीट सीटस] तसेच मूल्याधारित [पेमेंट सीटस] जागांकरिता त्यांच्या त्यांच्या प्रमाणात असावे.

[प्रक्रिया 3. गुणवत्ता यादीनुसार प्रवेश केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्या तर त्या जागेवर एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीतजास्त २ टक्के पर्यंत प्रवेशासाठी विशेष मागास प्रवर्गीय उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात यावे.

४. रिक्त जागांवर विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना कमाल २ टक्के जागांवर प्रवेश दिल्यानंतर जर जागा रिक्त राहिल्या तर त्या जागा इतर सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनुसार सरमिसळ करुन भरण्यात याव्यात.

३. शासन यापुढे असेही आदेश देत आहे की, १९९७-९८ या शैक्षणिक वर्षासाठी ज्या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असेल व दि. ९.७.१९९७ रोजी किंवा तत्पूर्वी या विभागाच्या दि. २२ जून, १९९५ च्या शासन निर्णयानुसार प्रवेश देण्यात आले असतील तर त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी:-

१. विशेष मागासवर्ग प्रवर्गांतर्गत करण्यात आलेल्या प्रवेशास बाधा न आणता पुढील प्रवेश प्रक्रियेत काही कारणास्तव होणाऱ्या रिक्त जागांवर ५० टक्के आरक्षित जागा मुळून घ्याव्यात.

२. संवैधानिक आरक्षण कुठल्याही परिस्थितीत ५० टक्क्यांपेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-

[अॅं. पि. पिंगळे]
शासनाचे सहसचिव.

प्रति,

१. राज्यपालांचे खाजगी सचिव,
२. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव,
३. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव,
५. मंत्री, वित्त यांचे खाजगी सचिव,
६. राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव,
७. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांचे स्वीय सहाय्यक,
८. सचिव, वित्त विभाग [व्यय] यांचे स्वीय सहाय्यक,
९. सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई.
१०. सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. सचिव, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, मुंबई.
१२. सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य,
१५. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१६. संचालक, तंत्र शिक्षण, [उद्योग-धंदे व संस्था समन्वय], मुंबई.
१७. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.

१८. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई.

१९. संचालक, कला संचालनालय, मुंबई.

२०. संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२१. तंत्र शिक्षण संचालनालयातील सर्व प्रशासकीय अधिकारी व कार्यासन अधिकारी [संचालक, तंत्रशिक्षण मार्फत],

२२. सहसंचालक/उपसंचालक उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व विभागीय कार्यालये, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर/कोल्हापूर.

२३. प्रशासकीय अधिकारी, विभागीय कार्यालये, [उपसंचालकांमार्फत]

२४. अध्यक्ष, तंत्रशिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई.

२५. सचिव, तंत्रशिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई.

२६. उपसचिव, तंत्रशिक्षण परीक्षा मंडळ, विभागीय कार्यालये, पुणे, औरंगाबाद, नागपूर

२७. उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत असलेल्या सर्व शासकीय, अनुदानित शैक्षणिक संस्थांचे प्राचार्य, [संबंधित विभागीय कार्यालयामार्फत]

२८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, [प्रसिध्दीकरिता], मुंबई.

२९. जनसंपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.

३०. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई.

३१. प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई [पत्राने].

३२. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई [पत्राने]

३३. शासन अभिवक्ता, उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर, औरंगाबाद,

३४. अतिरिक्त सरकारी वकील, उच्च न्यायालय [अपिलेट] मुंबई.

३५. सरकारी वकील, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, दिल्ली.

३६. सर्व मंत्रालयीन विभाग.

३७. उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभागातील सर्व सह/उप/सचिव,

३८. उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभागातील सर्व कार्यासन अधिकारी,

३९. अभियांत्रिकी/वास्तुशास्त्र/औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचे प्रवेश केंद्राधिकारी,

४०. निवड नस्ती-तांशि-१.